राष्ट्रीय आरोग्य अभियान

जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी

आरोग्य सेवा

बेटी बचाओ
Save the girl child

पत्ता:- जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी
फोन नं. :- ०२३५२ - २२२३६२ / २२२३६३
फॅक्स नं.:- ०२३५२ - २२२३६२
ई मेलcs_ratnagiri@rediffmail.com
जा.क्र.जिशचिर/एनएचएम/दरपत्रके/ 10925 /२५
जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे कार्यालय
दिनांक - 30 SEP 2025

# दरपत्रक सुचना

**विषय – रुग्णालय प्रशिक्षण केंद्र, रत्नागिरी जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे वेळोवेळी लागणारे स्टेशनरी साहित्य खरेदी करणेकरीता दरपत्रक मागविणेबाबत...**

जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी येथील सन २०२५-२६ रुग्णालय प्रशिक्षण केंद्र येथे विविध प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात येतात. सदर प्रशिक्षणाच्या वेळी प्रशिक्षणार्थींना देणेकरीता स्टेशनरी साहित्य खरेदी करावे लागते. तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता स्टेशनरी साहित्याची आवश्यकता असते. याकरीता आवश्यकतेप्रमाणे स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे करीता या सदरची दरपत्रके जाहिर सूचनेद्वारे इच्छुक पुरवठाधारकांकडून मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | प्रति १ नग दर |
|---|---|---|
| १ | स्टेशनरी साहित्य | |

तरी वरीलप्रमाणे आपण स्टेशनरी साहित्य पुरविण्यासाठी इच्छुक असाल तर आपले बाजार भावाचे (**सर्व करासहित**) दरपत्रक या कार्यालयाकडे दिनांक - १०/१०/२०२५ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावे.

**लिफाफा १ (तांत्रिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

१) शॉप ॲक्ट लायसन्स झेरॉक्स प्रत.

२) व्यवसायाच्या व्याप्ती नुसार जीएसटी क्रमांक आवश्यक जर जीएसटी क्रमांक नसल्यास तसे प्रमाणित केलेले मुळ प्रमाणपत्र आवश्यक.

३) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत.

**लिफाफा २ (आर्थिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

१) लिफाफा दोन मध्ये सिलबंद दरपत्रक सादर करावे.

**सदरचे तांत्रिक व आर्थिक लखोटा स्वतंत्र लखोटयामध्ये सिलबंद करुन जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे नावे कार्यालयीन वेळेत हे दरपत्रक प्रसिध्द झाले पासून अंतिम तारखेपर्यंत कार्यालयात पोहोच होतील असे पाठविण्यात यावेत.**

प्राप्त दरपत्रके हि मा.जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांच्या दालनात उघडण्यात येतील. अटी व शर्ती तसेच दरपत्रके मंजुर वा नामंजुर करणेचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांनी आपल्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

सदरची दरपत्रके ज्यांच्या नावे मंजुर केले जाईल त्यांना मंजुर दराप्रमाणे पुरविणेबाबतचे आदेश देण्यात येतील. आदेश प्राप्त झालेपासून पुढील एक वर्षासाठी मंजूर दराप्रमाणे पुरविणे बंधनकारक राहणार आहे.

१) सदर दरपत्रक सादर करताना वरील संख्याप्रमाणे दरपत्रक सादर करावे तसेच दरपत्रकावर **वैदयकीय अधिकारी वर्ग १ रुग्णालय प्रशिक्षण केंद्र स्टेशनरी साहित्य दरपत्रक** असे नमुद करावे.

२) दरपत्रके स्विकारण्याची मुदत नोटीस प्रसिध्दी दिनांक पासून २०/१०/२०२५.(सायं ०५ वाजेपर्यत) नंतर उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३) दरपत्रक मंजूर झालेवर सदरील स्टेशनरी साहीत्य कार्यालयामध्ये पोहोच करुन दयावयाचा आहे.

४) प्रत्येक प्रशिक्षणाच्या पूर्वी १ किंवा दोन दिवस आगावू कल्पना दिली जाईल त्यानुसार स्टेशनरी साहित्य पुरवावयाचे आहेत.

५) स्टेशनरी साहित्याचे देयक पी.एफ.एम.एस. द्वारे अदा केले जाईल.

६) वरील अटीमध्ये बदल करणे किंवा शिथिल करणे अथवा नवीन अट सामाविष्ट करण्याचा अधिकार मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

७) कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया कोणत्याही टप्यावर स्थगित ठेवण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार मा.जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी यांनी राखुन ठेवला आहे. त्यासाठी कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(डॉ.बी.व्ही.जगताप)
जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी

<u>कार्यालयाचा पत्ता</u>

मा.जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे कार्यालय,
जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयासमोर, जयस्तंभ, रत्नागिरी ता.जि.रत्नागिरी.
संपर्क क्रमांक : ०२३५२-२२२३६२, २२२३६३

**नोटीस प्रसिध्द दिनांक :-**

**प्रसिध्दीचे स्थळ :-** जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी नोटीस बोर्ड

**शासनाचे संकेतस्थळ :** https://arogya.maharashtra.gov.in/Site/Form/Publications.aspx